# प्रकरण ६ वे

# प्रकरण ६ वे

## शोध प्रबंधाचा सारांश

### [अ] प्रस्ताविक माहिती :-

[illegible]

१. अभ्यासकाचे नांव :- श्री रमेशचंद्र शंकर पिंपोळकर.

२. मार्गदर्शकाचे नांव :- प्राचार्य डॉ. च. बं. शितोळे. शिक्षण महाविद्यालय हाशी.

३. शोध प्रबंधाचे नांव:- इ. नववीच्या "मराठी" पाठ्यपुस्तकाचे सहाय्याने लोकसंख्या शिक्षण हा विषय शिकविण्यासाठी योग्य त्या जागात कोणता लोकसंख्या विषयक आशय भरता येईल याचा अभ्यास करणे.

४. विषय:- शिक्षण शास्त्र .

५] विद्यापीठ-पदवी :- मास्टर ऑफ फिलॉसॉफी, शिवाजी विद्यापीठ नोव्हेंबर १९८९

x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x

ब] प्रकल्पाची उद्दिष्टे.

१. लोकसंख्या शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यामागील कारणांचा शोध घेणे.

२. लोकसंख्या शिक्षण आणि सामाजिक विकास यांतील परस्पर संबंध स्पष्ट करणे.

३. लोकसंख्या शिक्षण आणि कुटुंब नियोजन यांतील फरक ओळखणे.

४. लोक संख्या आणि आर्थिक विकास यांतील संबंध स्पष्ट करणे.

५. मराठी पाठ्य विषयांतील मुद्यांशी लोकसंख्या विषयाची सांगड घालणे.

६. लोकसंख्या शिक्षण या विषयाच्या अध्यापनाची कार्यपद्धती ठरविणे.

७. लोकसंख्या वाढीचा पर्यावरणावर होणारा परिणाम जाणणे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

[क] प्रबंधाची संशोधन पद्धती :-

अभ्यासकाने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला. शहरी विभागातील व ग्रामीण विभागातील शाळांची निवड करून ई. ९ वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनींची लेखी मुल्यमापन व तोंडी मुल्य मापन केले. संशोधकांनी पुढील संशोधनांच्या साधनांचा उपयोग केला.

अ] प्रश्नावली :-

विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक आणि शिक्षण तज्ञ यांना प्रश्नावली देण्यात आली व माहिती गोळा केली.

ब] मुलाखती :-

अभ्यासक, शिक्षण तज्ञ, मुख्याध्यापक, मराठी विषयक शिक्षक यांची मुलाखत घेण्यात आली सद्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकांनी केला.

[ड] निष्कर्ष :-

संशोधकांनी एकत्र केलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले याचे स्वरूप पुढील प्रमाणे.

१] ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांना लोकसंख्या शिक्षण विषयाचा आशय माहित नाही. मराठी विषयाशी त्याची सांगड त्यांनी घातलेली नाही.

२] ग्रामीण व शहरी विभागातील विद्यार्थिनींना या विषयाबद्दल संकोच वाटतो.

३] ग्रामीण व शहरी विभागातील मराठी शिक्षक या विषयाचा प्रसार करण्याबाबत उदासीन दिसतात.

४] मुख्याध्यापकांनी या विषयाच्या अभ्यासाबाबत विशेष प्रशासकीय हालचाली केल्याचे आढळले नाही.

५. लोकसंख्या शिक्षण तज्ञांचे मार्गदर्शन सर्वांना लाभलेले आढळत नाही. मार्गदर्शनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन मार्गदर्शकांकडून प्रत्याभरणा कार्य केले जात नाही.

[इ] शिफारशी :-

लोकसंख्या शिक्षण विषयाचा आशय ई. ९ वी मराठी पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने शिकविण्यासाठी अभ्यासकांनी पाठांचे वर्गीकरण केले. पाठांचे नियोजन केले तसेच लेखन पाठांचे सविस्त्र विवरण सादर केले.

२. विद्यार्थी, विद्यार्थिनी, मराठी शिक्षक, मुख्याध्यापक व लोकसंख्या तज्ञ यांच्या कार्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी अभ्यास पूर्ण उपाय योजना अभ्यासकांनी सुचविलेली आहे.

३. या क्षेत्रामध्ये पुढील शोधकार्य हाती घेऊन ई. १०,११, १२ च्या अभ्यासक्रमाच्या मराठी पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने लोकसंख्या शिक्षणाचा आशय शिकविण्यासाठी अभ्यासकानी उपाययोजना सुचविलेली आहे. पाठाचे वर्गीकरण, पाठ्यांशाचे पृथःकरण, पाठाचे नियोजन, लेखन पाठाचे नियोजन इत्यादीचा कार्यक्रम हाती घेऊन लोकसंख्या शिक्षण हा विषय मराठी पाठ्यपुस्तकाच्या सहाय्याने उच्च माध्यमिक पातळीवर शिकविण्यास शिफारशी दिल्या आहेत.

[फ] <u>शोध प्रबंधाचे स्वरूप</u> :-

शोध प्रबंधामध्ये पाच प्रकरणांचा समावेश झालेला आहे. त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

[१] <u>प्रकरण १ले</u> :- प्रस्तावना व लोकसंख्या शिक्षणाचे महत्व.

[२] प्रकरण २ रे:- संदर्भ साहित्याचा अभ्यास.

[३] प्रकरण ३ रे:- संशोधनपद्धती व समीक्षा.

[४] प्रकरण ४ थे:- गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व मराठी विषयाच्या पाठाचे विश्लेषण नियोजन इत्यादी.

[५] प्रकरण ५ वे:- निष्कर्ष व शिफारशी.

[६] प्रकरण ६ वे:- शोधप्रकल्पाचा गोषवारा.

<u>परिशिष्ट</u> :-:-: प्रश्नावली शील, प्रतिसाद, नामावली, संदर्भ ग्रंथसूची इत्यादी अशाप्रकारे अभ्यासकांनी समस्या जाणून घेऊन माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले व त्यांवर योग्य ती उपाय योजना सुचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.